# अर्थशास्त्र विभाग

# (सत्र : 2022-23)

श्री पंढरीनाथ कला वाणिज्य महाविद्यालय अंतर्गत अर्थशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक-22/11/22 अर्थशास्त्र विभागात **'अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन व अर्थशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना'** करण्यात




आली कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वरिष्ठ प्राध्यापक शरद मेंगळ सर, प्राध्यापक डॉक्टर रवी सोरते व प्रमुख मार्गदर्शक डॉ. सतीश जाधव (नगरपरिषद शिवाजी महाविद्यालय, मोवाड) हे उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक डॉ. सतीश जाधव सरांनी अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन करून **बौद्धिक संपदा अधिकार** या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना पाच बौद्धिक संपदा अधिकाराबद्दल विस्तृत माहिती दिली. बौद्धिक संपदा अधिकार वर्तमान काळात मानवी गरज निर्माण झालेली आहे असे सांगितले.




याबरोबरच मनुष्याला मूलभूत अधिकार सुद्धा महत्त्वाचे आहेत. अर्थशास्त्राच्या व्याख्येवरून तर बौद्धिक संपदा अधिकारापर्यंत खेडीमेडीच्या वातावरणात त्यांनी आपले मार्गदर्शन केले याचा विद्यार्थ्याला नक्कीच फायदा झालेला आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बीकॉम भाग एक ची विद्यार्थिनी कु. खुशबू ठोंबरे तर आभार बी. कॉम भाग एक ची विद्यार्थिनी कु. यामिनी दुहीजोड केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे आयोजक प्रा. डॉ. रवी सोरते अर्थशास्त्र विभाग प्रमुख यांनी केले. तर अध्यक्षीय भाषणामध्ये मेघळ सरांनी आधुनिक काळामध्ये विद्यार्थ्यांकरीता बौद्धिक संपदा अधिकार हा महत्त्वाचा विषय आहे असे सांगितले.

कार्यक्रमाकरिता महाविद्यालयातील डॉ. श्वेता बाजपाई, डॉक्टर अनिल गणवीर, प्राध्यापक सतीश चंदेल, प्राध्यापक पवन महंत, प्राध्यापक अशोक मदनकर, प्राध्यापिका कु. नांदेकर व कु. मदनकर व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

श्री पंढरीनाथ कला वाणिज्य महाविद्यालय नरखेड येथील अर्थशास्त्र विभागाच्या व ग्रंथालयाच्या वतीने केंद्रीय अंदाजपत्रक - 2023 भित्तीपत्रक प्रदर्शनी व अर्थशास्त्र ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन ग्रंथालयामध्ये करण्यात आली होते. केंद्रीय अर्थसंकल्प 2023 मधील सर्वसामान्य व्यक्तीच्या वाट्याला




काय गोष्टी आले आहेत. जगामध्ये सर्वात मोठी युवाशक्ती भारतामध्ये आहे त्यामुळे युवकांच्या वाट्याला केंद्रीय अर्थसंकल्पात काय आले तसेच महिला, गृहणी, वृद्ध, उद्योग, कृषी, रेल्वे, सेवाक्षेत्र, कर व वैयक्तिकत कर या सर्व गोष्टीवर प्रकाश टाकण्याचा एक छोटासा प्रयत्न महाविद्यालय विद्यार्थ्यांनी केला आहे. केंद्रीय अंदाजपत्रक प्रदर्शनी बनविण्याकरिता बी.कॉम. भाग -1 व बी.ए. भाग-2 च्या विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले असून, अंदाजपत्रक म्हणजे काय अंदाजपत्रक तयार करण्यासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता असते, ते सर्वसामान्यांच्या दृष्टिकोनातून किती महत्त्वाचे




आहे, अंदाजपत्रक हे व्यक्तीच्या जीवनातला एक महत्त्वाचा घटक म्हणून आज समजले जाते या सर्व



गोष्टी विद्यार्थ्यांनी आपल्या प्रदर्शनी मधून समजावून सांगण्यात आल्या. याकरिता अर्थशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. रवी सोरते व ग्रंथपाल श्री सतीश चंदेल यांनी मार्गदर्शन केले. या ग्रंथ प्रदर्शनीचा लाभ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासक्रमाच्या दृष्टिकोनातून तर घेतलाच तसेच

आपले जीवन जगण्याच्या दृष्टीने आर्थिक निर्णय घेण्याकरिता सुद्धा ते महत्त्वाचे ठरले.

केंद्रीय अंदाजपत्रक 2023 चे उद्‌घाटन संस्थेचे संचालक सदस्य प्रा. शरद मेंघळ यांनी केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्‌यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत जवंजाळ व अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. रवी सोरते व ग्रंथपाल श्री. सतीश चंदेल उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्‌यालयातील प्रा.डॉ. विजय राऊत,प्रा.डॉ. समीर पाहूणे, प्रा.डॉ. सुधाकर पवार, प्रा.पवन महतं, प्रा.डॉ. श्वेता बाजपेयी, प्रा. कु. मदनकर,प्रा. कु. नांदेकर, प्रा. कु.गेडाम, प्रा. अशोक मदनकर, राहुल धुर्वे, विवेक बालपांडे यांनी सहकार्य केले.